RNI No. MAHBIL/2009/35530

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार

वर्ष ३, अंक २४] शनिवार, सप्टेंबर १७, २०११/भाद्र २६, शके १९३३ [ पृष्ठे ७, किंमत : रुपये २०.००

**असाधारण क्रमांक ६१**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय,**

**राजभवन, मुंबई-४००० ३५, दिनांक:- ०५ सप्टेंबर, २०११.**

# आदेश

**भारताचे संविधान.**

क्रमांक: जीएस/डिबी/नियम १४/२०११/१५०.- भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३७१ द्वारे भारताच्या राष्ट्रपतीनी काढलेला महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ याव्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मी, के. शंकरनारायणन, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश काढीत आहे:-

**१. संक्षिप्त नाव व प्रारंभ .-** (१) या आदेशास, विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, २०११ असे म्हणता येईल.

(२) तो, राज्यपालांनी, राजपत्रातील आदेशाद्वारे नेमून दिलेल्या दिनांकास अंमलात येईल.

(३) जोपर्यंत महाराष्ट्र राज्य (विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी राज्यपालांची विशेष जबाबदारी) आदेश, १९९४ अंमलात राहील, त्या दिनांकापर्यंत व तो दिनांक धरून अंमलात राहील.

**२. विकास मंडळांची स्थापना .-** महाराष्ट्राचे राज्यपाल, याबाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाव्दारे, महाराष्ट्र राज्यातील विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र कार्यक्षेत्रासाठी प्रत्येकी एक विकास मंडळ गठित करतील. ही मंडळे अनुक्रमे पुढीलप्रमाणे ओळखली जातील,-

(अ) विदर्भ विकास मंडळ;

(ब) मराठवाडा विकास मंडळ ;

(क) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळ.

**३. विकास मंडळांची कार्यक्षेत्रे.-** संबंधित विकास मंडळांची कार्यक्षेत्रे पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असतील,-

(अ) विदर्भ विकास मंडळामध्ये नागपूर आणि अमरावती महसूल विभागांच्या कार्यक्षेत्रांचा समावेश असेल;

(ब) मराठवाडा विकास मंडळामध्ये औरंगाबाद महसुली विभागाच्या कार्यक्षेत्रांचा समावेश असेल;

(क) उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळामध्ये कोकण, पुणे आणि नाशिक महसुली विभागांच्या कार्यक्षेत्रांचा समावेश असेल.

**४. विकास मंडळांची रचना.-**

**(१)** प्रत्येक विकास मंडळ हे, अध्यक्षासहित पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल आणि त्यांची नियुक्ती राज्यपालांकडून करण्यात येईल,--

(अ) राज्य नियोजन मंडळाचा कार्यकारी अध्यक्ष, या सर्व तीनही विकास मंडळांचा पदसिध्द सदस्य असेल;

(ब) मराठवाडा विकास मंडळाच्या बाबतीत, औरंगाबाद महसुली विभागातून महाराष्ट्र राज्य विधानमंडळाचा एक सदस्य असेल, आणि इतर विकास मंडळांच्या बाबतीत, संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रामधील प्रत्येक महसुली विभागातून (विभागांतून) महाराष्ट्र विधान मंडळाचा एक सदस्य, आळीपाळीने, अडीच वर्षांच्या मुदतीसाठी असेल. अशा सदस्याने त्याची मुदत पूर्ण केल्यावर, तो, लागोपाठच्या मुदतींसाठी पात्र असणार नाही;

(क) संबंधित विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रातील, स्थानिक नागरी प्राधिकरणातून व स्थानिक ग्रामीण प्राधिकरणातून प्रत्येकी एक सदस्य, आळीपाळीने, अडीच वर्षांच्या मुदतीसाठी असेल. अशा सदस्याने त्याची मुदत पूर्ण केल्यावर, तो, लागोपाठच्या मुदतींसाठी पात्र असणार नाही;

(ड) सामाजिक-आर्थिक विकासामध्ये कार्यरत असलेल्या अशासकीय संघटना आणि राष्ट्रीय/राज्य स्तरावरील नामवंत संस्था यांच्या प्रतिनिधींसह पाच तज्ज्ञ व्यक्ती. किमान एक तज्ज्ञ व्यक्ती ही, प्रत्येक महसुली विभागातील असेल. या तज्ज्ञ व्यक्तींकडे, प्रशासन विकास, नियोजन प्रक्रिया, शासनाची वित्तव्यवस्था व लेखे किंवा विविध सामाजिक-आर्थिक क्षेत्रांमधील विशेष ज्ञान असेल;

(इ) संबंधित विकास मंडळांच्या कार्यक्षेत्रातील महसूल विभागांचे आयुक्त;

(फ) महसुली विभागाच्या अपर आयुक्ताच्या दर्जाहून कमी दर्जा नसलेला राज्य शासनाचा अधिकारी हा, प्रत्येक संबंधित विकास मंडळाचा सदस्य-सचिव असेल.

**(२)** उर्वरित महाराष्ट्र विकास मंडळामध्ये, प्रत्येक महसुली विभागासाठी, त्या महसुली विभागातील विकासाच्या विशिष्ट प्रश्नांवर विचार करण्यासाठी, संबंधित विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली आणखी एक उप-समिती असेल. या उप-समित्यांची कार्ये विकास मंडळाच्या कार्यांसारखीच असतील, परंतु त्या समित्या, विकास मंडळाला अहवाल देतील आणि विकास मंडळाच्या संपूर्ण पर्यवेक्षणाखाली व मार्गदर्शनाखाली कार्य करतील.

**(३) उप-समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-**

| | | |
|---|---|---|
| १. | संबंधित महसुली विभागाचा विभागीय आयुक्त. | अध्यक्ष |
| २. | वरील खंड (१)(ब) मध्ये नमूद केल्याप्रमाणे संबंधित महसुली विभागातून एक सदस्य. | सदस्य |
| ३. | वरील खंड (१)(ड) मध्ये नमूद केलेल्या सदस्यांमधून, विकास मंडळाच्या अध्यक्षाने नियुक्त केलेल्या किमान दोन तज्ज्ञ व्यक्ती. | सदस्य |
| ४. | विकास मंडळाच्या अध्यक्षाने संबंधित महसुली विभागाच्या स्थानिक नागरी व ग्रामीण संस्थांमधून अडीच वर्षांच्या मुदतीसाठी नियुक्त केलेला प्रत्येकी एक सदस्य. अशा सदस्याने त्याची मुदत पूर्ण केल्यावर, तो, लागोपाठच्या मुदतीसाठी पात्र असणार नाही. | सदस्य |
| ५. | विकास मंडळाचा सदस्य-सचिव. | सदस्य-सचिव |

**५. मंडळ व उप-समित्या यांचे अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी आणि त्यांना देय असलेले भत्ते.-** (अ) अध्यक्ष आणि सदस्य यांचा पदावधी, त्यांच्या नियुक्तीच्या वेळी राज्यपाल विनिर्दिष्ट करतील, त्याप्रमाणे राहील. राज्यपाल, अध्यक्षासह कोणत्याही सदस्याची नियुक्ती, त्याचा पदावधी समाप्त होण्यापूर्वी रद्द करू शकतील किंवा, यथास्थिति, मंडळाची मुदत पूर्ण होण्यापूर्वी मंडळाची पुनर्रचना करू शकतील.

(ब) अध्यक्ष आणि खंड ४ च्या उप-खंड (१) मधील परिच्छेद (ड) मध्ये, निर्दिष्ट केलेल्या सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्य हे सदस्य असतील आणि ज्या, प्रवर्गामधून तो सदस्य म्हणून नियुक्त करण्यात आला असेल त्या प्रवर्गाचे सदस्यत्व संपुष्टात आल्याबरोबर, अशा सदस्याचे सदस्यत्व किंवा यथास्थिति, अध्यक्षांचे अध्यक्षपद संपूष्टात येईल.

(क) खंड ४ च्या उप-खंड (१) च्या परिच्छेद (अ),(इ) व (फ) मध्ये निर्देशिलेल्या सदस्यांव्यतिरिक्त, अध्यक्षासह कोणत्याही सदस्यास कोणत्याही क्षणी आपल्या पदाचा लेखी राजीनामा स्वतःच्या सहीने राज्यपालांकडे देता येईल आणि ज्या दिवसापासून त्याचा राजीनामा राज्यपालांकडून स्वीकृत करण्यात येईल त्या दिवसापासून तो पदमुक्त झाल्याचे मानण्यात येईल.

(ड) अध्यक्षाला आणि सदस्यांना विकास मंडळांच्या बैठकींना हजर राहण्यासाठी आणि विकास मंडळांची इतर कोणतीही कामे करण्यासाठी, राज्यपाल वेळोवेळी ठरवून देतील अशी फी व भत्ते देण्यात येतील.

**६. विकास मंडळांची कार्ये:-** विकास मंडळे, वेळोवेळी-

(अ) मंडळाच्या कार्यक्षेत्राची साधनसंपत्ती, गरजा व संधी यांचा विचार करून आणि संपूर्ण राज्याचा विकास लक्षात घेऊन, त्यांच्या कार्यक्षेत्राच्या संबंधात, सामाजिक-आर्थिक विकासाच्या क्षमतेची निश्चिती करतील;

(ब) विकास मंडळांच्या कार्यक्षेत्रामध्ये ज्यांच्यावर विशेष लक्ष देण्याची आवश्यकता असेल अशी कार्यक्षेत्रे,भाग,लोकसंख्या गट निश्चित करतील;

(क) प्रादेशिक/जिल्हा विकास अहवाल तयार करतील आणि ते नियतकालाने अद्ययावत करतील. प्रादेशिक/ जिल्हा विकास अहवालांमध्ये पुढील बाबींचा समावेश असेल,-

(एक) स्थानिक मानवी व नैसर्गिक साधनसंपत्तीचे निर्धारण व सामाजिक-आर्थिक विकासा बाबतची क्षमता यांचे पृथःक्करण;

(दोन) संबंधित सामाजिक-आर्थिक क्षेत्रांच्या विकास निर्देशांकानुसार महत्वाच्या लोकसंख्या गटांची विकास स्थिती;

(तीन) आरोग्य, शिक्षण व उपजीविकेचे प्रश्न यांसारख्या मानवी विकास निर्देशांकाच्या विकास स्थितीची संगणना;

(चार) प्रदेशांची साधनसंपत्ती व त्यांची क्षमता यांच्या आधारे प्रादेशिक विकास योजनेचा आराखडा;

(पाच) योजनांतर्गत कार्यक्रमाच्या आणि संपूर्ण प्रादेशिक विकासाच्या निर्धारणावरील व मूल्यमापनावरील परिणाम.

(ड) वार्षिक, तसेच पंचवार्षिक योजनेच्या काळात गरजाधारित संतुलित प्रादेशिक विकास विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रावरील विकास खर्चाच्या पातळया सुचवतील;

(इ) मंडळाच्या कार्यक्षेत्राचा सर्वांगीण विकास साधण्याच्या दृष्टीने तसेच त्या भागातील विकासाचा प्रादेशिक असमतोल दूर करण्याच्या दृष्टीने करण्यात आलेल्या विविध विकासाच्या प्रयत्नांच्या परिणामांचे मूल्यमापन करतील;

(फ) मंडळाच्या कार्याचा वार्षिक अहवाल तयार करतील व तो, महाराष्ट्र राज्य विधानमंडळापुढे सादर करण्यासाठी प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यावर व्यवहार्य असेल तेथवर, तीन महिन्यांच्या कालावधीत राज्यपालांना सादर करतील.

**७. विकास खर्चासाठी निधीचे वाटप.-** (अ) राज्याची एकूण गरज साकल्याने विचारात घेऊन विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रांवरील विकास खर्चासाठी, महाराष्ट्राचे राज्यपाल, निधीचे समन्यायाने वाटप व्हावे याची खातरजमा करतील.

(ब) निधीचे समन्यायाने वाटप होईल याची खातरजमा करताना, राज्यपाल-

(एक) विकास मंडळाने कोणत्याही शिफारशी केल्या असल्यास त्या विचारात घेतील, आणि

(दोन) निधीच्या वाटपाच्या बाबतीत, राज्यपाल त्यांना आवश्यक आणि योग्य वाटेल अशा कोणत्याही

व्यक्तीचा किंवा व्यक्तीसंघाचा सल्ला घेऊ शकतील.

**८. वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये, निधीच्या वाटपाचा निर्देश करणे.-** निधी किंवा नियतव्यय यांच्या, राज्यपालांनी ठरवून दिलेल्या वाटपाचा निर्देश, राज्य विधानमंडळापुढे सादर करावयाच्या वार्षिक वित्तीय विवरणपत्रामध्ये (पुरवणी अर्थसंकल्पासह) करण्यात येईल आणि उपरोक्त नियतव्ययाशी संबंधित विकास कार्ये राज्य शासनाकडून पूर्ण करण्यात येतील वा पूर्ण करून घेण्यात येतील आणि अशाप्रकारे देण्यात आलेला निधी हा, एका मंडळाच्या कार्यक्षेत्रामधून दुस-या मंडळाच्या कार्यक्षेत्राकडे वळविता येणार नाही. राज्य शासन, सर्व क्षेत्रांकरिताच्या विकास खर्चासाठी प्रदेशनिहाय व प्रवर्गनिहाय नियतव्यय व खर्च यांचे विवरणपत्र देखील तयार करील. या विवरणपत्रामध्ये मागील वित्तीय वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व सुधारित खर्च यांचा तसेच, मागील वित्तीय वर्षाच्या अगोदरच्या वर्षासाठीच्या प्रत्यक्ष संवितरित रकमा व प्रत्यक्ष खर्च यांचा तपशील दिलेला असेल.

परंतु-

(अ) एखाद्या मंडळाच्या कार्यक्षेत्रामध्ये पूर्वोक्तानुसार हाती घेण्यात आलेल्या विकास कार्याच्या बाबतीत, अर्थसंकल्पीय नियम व कार्यपध्दतीला अनुरूप असे पुनर्विनियोजन करता येईल;

(ब) विकास कार्याची अंमलबजावणी करताना सध्याचे मापदंडच लागू राहतील; आणि

(क) विकास कार्यावर संबंधित प्रशासकीय विभागांचे प्रशासकीय व तांत्रिक पर्यवेक्षण आणि नियंत्रण सध्याप्रमाणे चालू राहील.

**९. राज्यपालांकडून निदेश.-** विकास मंडळाच्या कामकाजाच्या संदर्भात राज्यपाल, विकास मंडळाला वेळोवेळी, आदेशाद्वारे, निदेश देऊ शकतील. राज्यपालांनी दिलेल्या अशा कोणत्याही निदेशांचे मंडळाकडून अनुपालन करण्यात येईल.

**१०. शिक्षण, प्रशिक्षण आणि सेवायोजन यांसाठी सुयोग्य व्यवस्था.-** संपूर्ण राज्याच्या गरजा साकल्याने लक्षात घेऊन, प्रत्येक विकास मंडळाच्या कार्यक्षेत्रासाठी तंत्रशिक्षण व व्यावसायिक प्रशिक्षण यासाठी पर्याप्त सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आणि राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सेवांमध्ये नोकरीच्या पर्याप्त संधी उपलब्ध करून देण्यासाठी समन्यायी व्यवस्था करण्याची राज्यपाल खातरजमा करतील आणि त्या प्रयोजनासाठी राज्यपाल, वेळोवेळी, राज्य शासनास योग्य ते निदेश देतील, आणि असे करीत असताना, आवश्यक आणि योग्य वाटल्यास, राज्यपाल, कोणत्याही एका व्यक्तीचा किंवा व्यक्तिसंघाचा या बाबतीत सल्ला घेऊ शकतील.

**११. नियम.-** संविधानाच्या अनुच्छेद ३७१, खंड (२) खालील राज्यपालांच्या कार्यांच्या संबंधातील कामकाज योग्यरीत्या पार पाडण्याबाबतच्या आणि या आदेशातील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी व्हावी याबाबतच्या नियमांसह राज्यपाल, वेळोवेळी, त्यांना आवश्यक वाटतील असे नियम आदेशाद्वारे तयार करतील.

**१२.** विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, १९९४ याचे अधिक्रमण.- **(१)** हे आदेश लागू झाल्याबरोबर, दिनांक ३० एप्रिल,१९९४ रोजीचा "विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, १९९४" याचे अधिक्रमण होईल.

**(२)** विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, १९९४ (यात यापुढे ज्याचा "उक्त आदेश" असा उल्लेख करण्यात आला आहे) याचे अधिक्रमण झाले असले तरी,

(अ) उक्त आदेशाच्या खंड ११ खाली केलेले सर्व नियम, या आदेशाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, या आदेशाखाली केलेल्या नियमांद्वारे त्यांचे अधिक्रमण केले जाईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहतील;

(ब) उक्त आदेशान्वये गठित केलेल्या विकास मंडळांचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून पद धारण करणारी प्रत्येक व्यक्ती ही, या आदेशान्वये गठित केलेल्या संबंधित मंडळाचा अधिकारी किंवा कर्मचारी असल्याचे मानण्यात येईल आणि त्या पदावर असण्याचे चालू राहील;

(क) विद्यमान मंडळाची सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता, आणि सध्या अस्तित्वात असलेल्या मंडळाकडील विवादांसह सर्व अधिकार तत्सम मंडळाकडे हस्तांतरित व त्यामध्ये निहित होतील आणि ज्यासाठी तत्सम मंडळ गठित केले असेल ती उद्दिष्टे व प्रयोजने यांसाठी त्यांचे उपयोजन करण्यात येईल;

**राजभवन,**
**मलबार हिल, मुंबई ४०० ०३५.**
दिनांक : ५ सप्टेंबर,२०११.

**के. शंकरनारायणन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
राज्यपालांचे सचिव.

**महाराष्ट्राच्या राज्यपालांचे सचिव यांचे कार्यालय,**
**राजभवन, मुंबई-४००० ३५, दिनांक:- ०५ सप्टेंबर, २०११.**

# आदेश

**विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, २०११**

**क्रमांक. जीएस/डीबी/नियम-१४/२०११/१५१.-** विदर्भ, मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी विकास मंडळे आदेश, २०११ याच्या खंड १ च्या उप-खंड (२) आणि खंड ४ यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, मी, के.शंकरनारायणन, महाराष्ट्राचा राज्यपाल, याद्वारे,-

(एक) हा आदेश अंमलात येण्याचा दिनांक ५ सप्टेंबर,२०११ म्हणून नेमून देत आहे;

(दोन) विदर्भ,मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र यांसाठी अनुक्रमे नागपूर, औरंगाबाद व कोकण महसुली विभागांचे विभागीय आयुक्त हे पुढील आदेश होईपर्यंत, अध्यक्ष असतील अशी विकास मंडळे गठित करीत आहे.

राजभवन,
मलबार हिल, मुंबई - ४०० ०३५.
दिनांक : ५ सप्टेंबर,२०११.

**के. शंकरनारायणन,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विकास चंद्र रस्तोगी,**
राज्यपालांचे सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.